महाराष्ट्र शासन

क्र. टिपीबी ४३१७/१००५/प्र.क्र.३०२/२०१७/नवि-११
नगर विकास विभाग, मंत्रालय, ४ था मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई -३२.
दिनांक :- ०६ जानेवारी, २०१८.

प्रति,
आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका.

विषय :- शासनास भरणा करणेत यावयाच्या अधिमूल्यामध्ये हप्त्यांची सवलत मिळणेबाबत....

संदर्भ :- १)क्रेडाई-एमसीएचआय यांचे पत्र क्र. MCHI/PRES/१७- १८/०४२ दिनांक १०.११.२०१७

२) आपले पत्र क्र. MGR/४८४७ दिनांक २८.१२.२०१७

महोदय,

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीचे तरतूदीनुसार खालील बाबींवर अधिमूल्याची रक्कम देय असून त्यामध्ये राज्य शासनाचा हिस्सा आहे.

(१) विनियम ३२ नुसार अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकावरील अधिमूल्यामध्ये ५०% हिस्सा.

(२) विनियम ३३ नुसार अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकावरील अधिमूल्यामध्ये ५०% हिस्सा.

(३) विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ३५(४) नुसार फंजीबल चटई क्षेत्र निर्देशांकापोटी अधिमूल्यामध्ये १/३ हिस्सा.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने अधिमूल्य आकारणीमध्ये त्यांच्या हिश्श्याच्या रक्कमेवर हप्त्यांची सवलत दिलेली असून त्याप्रमाणे शासनाच्या अधिमूल्याच्या हिश्श्यावर खाली नमूद केलेप्रमाणे सवलत देणत येत आहे.

(अ) ७० मीटर पर्यंतची प्रस्तावित उंची असलेल्या इमारती.

| Initial payment | At the end of Months with interest | |
|---|---|---|
| | 12th | 24th |
| 1st Installment | 2nd Installment | 3rd Installment |
| **33%** | **33%** | **34%** |

(ब) ७० मीटर किंवा त्यापेक्षा जास्त उंची प्रस्तावित असलेल्या इमारती.

| Initial payment | At the end of Months with interest | | |
|---|---|---|---|
| | 12th | 24th | 36th |
| 1st Installment | 2nd Installment | 3rd Installment | 4th Installment |
| 25% | 25% | 25% | 25% |

IOD मंजूरीच्या वेळेस पहिला हप्ता भरुन घेणे बंधनकारक राहील आणि उर्वरित रकमेवर १२% प्रमाणे व्याजाची आकारणी करण्यात येईल. सदर शिल्लक रकमांची ठरलेल्या वेळेत अदाई न केल्यास त्यावर १८% प्रमाणे दंडनीय व्याज आकारले जाईल. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणेच शासनाच्या प्रिमियमच्या हप्त्यांची वसुली केली जावी आणि त्यावर बृहन्मुंबई महानगर पालिकेने संनियंत्रण ठेवावे, असे आपणांस कळविणेचे मला आदेश आहेत.

आपला,

( प्रदीप गोहील )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, क्रेडाई-एमसीएचआय